# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 316/2022 दिनांक : 15.08.2022

## 1)खुनः—

**बारड :—**दिनांक 13.08.2022 रोजी चे 10.00 ते दि. 14.08.2022 रोजी चे 09.30 वा. चे दरम्यान, **नांदेड ते भोकर जाणारे महामार्गालगत असलेल्या श्रीनिवास उत्तम देशमुख यांचे बारड शिवारातील शेता लगतच्या कॅनालचे चारी मध्ये बारड शिवार ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे सुशिला त्र्यंबकराव श्रीमंगले, वय 29 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गितानगर ता. जि. नांदेड,** हिस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी कशाच्यातरी सहाय्याने गळा आवळुन खुन केला आहे. वगैरे **फिर्यादी शशिकांत त्र्यंबकराव श्रीमंगले, वय 33 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. गितानगर नांदेड ह. मु. विजापुर जि. विजापुर राज्य छतीसगड,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरन 60/2022 कलम 302, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री वानोळे, मो.नं. 8208506753** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :—

**नांदेड ग्रामीण :—**दिनांक 14.08.2022 रोजी चे 11.30 ते 11.45 वा. चे दरम्यान, **वांगी फाटयाचे समोर वीट भट्टीचे जवळ ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा मो सा ने मुदखेड ते नांदेड येथे जात असतांना वांगी फाटयाचे समोर विटभट्टीचे जवळ आला असता पाठीमागुन अचानक दोन मो सा वर चार अज्ञात आरोपी येवुन संगणमत करून फिर्यादीची मा सा अडवुन फिर्यादीला थापडा बुक्कयांनी मारहाण करून बाजुच्या शेतात नेवुन त्यातील एकाने फिर्यादीचे दोन्ही मांडीवर चाकुने मारून दुखापत केली व दुसऱ्याने त्याचे हातातील लाकडाने व बुक्क्यांने फिर्यादीचे डोक्यात मुक्का मार दिला आहे. व त्यातील एकाने फिर्यादीचे खिशातील 1,35,000/—रूपये व रेडमी कंपणीचा मोबाईल किंमती 15,000/—रूपयाचा असा एकुण 1,50,000/—रूपयाचा ऐवज जबरीने चोरून नेला आहे. वगैरे **फिर्यादी महमद इम्रान महमद युसूफ, वय 30 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. नई आबादी मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 496/2022 कलम 394, 323, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास** पोउपनि/श्री आनंद बिचेवार, **मो.क्रं. 9561038001** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :—

**1)नायगाव :—** दिनांक 13.08.2022 रोजी चे 11.00 ते 19.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी मौ. मांजरम ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा आपले घराला कुलूप लावुन शेतात हळदीला खत टाकण्यासाठी गेला असता कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीचे घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून सोन्याचे दागीने व नगदी 10,000/—रूपये असा एकुण 70,000/—रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी शिवानंद बालाजी शिंदे, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती रा. मांजरम ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरन 125/2022 कलम 454, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ/**2040 शेख मो.क्रं. 8793872040** हे करीत आहेत.

**2)रामतिर्थ :—** दिनांक 12.08.2022 रोजी चे 12.00 ते 14.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरी मौ. गागलेगाव ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी बाईने फिर्यादीचे घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून घरातील कपाटात ठेवलेले सोन्या—चांदीचे दागीने व नगदी असा एकुण 37,000/—रूपयाचा ऐवज चोरून नेली आहे. वगैरे **फिर्यादी रामचंद्र लक्ष्मण जाधव, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी जात मातंग रा. गागलेगाव ता. बिलोली जि नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरन 129/2022 कलम 454, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री शेख मो.क्रं. 9960161935** हे करीत आहेत.

**3)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 12.08.2022 रोजी चे 01.30 ते 06.00 वा. चे दरम्यान, **राज उर्दु प्राथमीक शाळा मोहमदीया कॉलनी देगलुर नाका नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी राज उर्दु प्राथमीक शाळा मोहमदीया कॉलनी देगलुर नाका शाळेचे रूमचे दरवाजाचे कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करून रूममध्ये ठेवलेले कॉमरन कंपणीची पाण्याची मोटार किंमती 10,000/—रूपये व लोखंडी ग्रीन किंमती 6,000/—रूपयाचे असा एकुण 16,000/—रूपयाचा माल चोरून नेला आहे. वगैरे **फिर्यादी महमद साबीर पि. महमद खादर, वय 52 वर्षे, व्यवसाय मुख्याध्यापक रा. माहमदीया कॉलनी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 495/2022 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम, मो.क्रं. 9284351496** हे करीत आहेत.

## 4)जनावर चोरी :–

**विमानतळ** :–दिनांक 13.08.2022 रोजी चे 22.00 ते दि. 14.08.2022 चे 10.00 वा. चे दरम्यान, **ब्राहयमसिंगनगर येथील परळे बिअर शॉप समोर नांदेड येथे,** यातील फिर्यादीची एक काळया रंगाची कारवड किंमती 15,000/–रूपयाची एक पांढऱ्या व केशरी रंगाची कारवड किंमती 17,000/–रूपयाचीा एक गाय काळया व पांढऱ्या रंगाची किंमती 30,000/–रूपयाची असा एकुण 62,000/–रूपयाचे पशुधन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी अभिषेक दिगंबर परळे, वय 19 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. नमस्कार चौक नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 283/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास** पोहेकॉ/**1792 लोखंडी, मो. क्र. 9527810006** हे करीत आहेत.

## 5)मो. सा. चोरी :–

**शिवाजीनगर** :– दिनांक 06.08.2022 रोजी चे 17.00 ते 20.00 वा. चे दरम्यान, **लेबर कॉलनी नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मॅक्स्टो हिरो कंपनीची स्कुटी क्रं. एमएच–26/एएच–6552 किंमती 40,000/– रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी सौ. मेरी बेलंगणी भ्र. फीलीप पीटर, वय 47 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. लेबर कॉलनी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरन 299/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/847 गायकवाड, मो.क्रं. 9322995681** हे करीत आहेत.

## 6)अपघात :–

**1)रामतिर्थ** :– दिनांक 09.05.2022 रोजी 13.00 वा. चे सुमारास, **मौ. आदमपुर कमानीजवळ ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे शेख अखिल पि. शेख शकील, वय 24 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** हा ॲटो क्र. टीएस–17/टी–3040 मध्ये बसुन मोहरम या कार्यक्रमास हिंगणी येथे जात असतांना आदमपुर कमानी जवळ बाथरूम साठी ॲटो थांबला असता पाठीमागुन कार क्रमांक टीएस–27/डी–8458 चे चालकाने त्याचे ताब्यातील कार हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन ॲटोला पाठीमागन जोराची धडक दिली असता ॲटो पलटी होवुन वरील मयत हा मरण पावला व फिर्यादी व इतर नातेवाईक गंभीर जखमी झाले आहेत. त्याचे मरणास सदर कार चालक कारणीभुत झाला आहे. आरोपी हा अपघात ग्रस्ताना मदत न करता पळुन गेला आहे. वगैरे **फिर्यादी शेख इमकरान पि. शेख अफसर, वय 32 वर्षे, व्यवसाय ॲटो चालक रा. कारवे गल्ली देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरनं. 128/2022 कलम 304(अ),279,337,338 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री इंगळे, मो.क्र. 7066981443** हे करीत आहेत.

**2)भोकर** :– दिनांक 09.08.2022 रोजी चे 19.00 वा. चे सुमारास, **बालाजी पेट्रोल पंपा समोरील रोडवर नारवट शिवार ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे अंजनाबाई देविदास चौपारे, रा. नारवट ता. भोकर जि. नांदेड** हि भोकर येथे बाजार करून भोकर ते नांदेड जाणाऱ्या महामार्ग रोडने पायी जात असतांना नांदेडकडुन भोकरकडे जात असलेली मो सा क्रमांक आरजे–23/एसएस–6989 च्या चालकाने आपले ताब्यातील मो सा हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन तिला समोरून जोराची धडक देवुन तीचे मरणास कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी अविनाश देविदास चोपारे, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. नारवट ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं. 281/2022 कलम 304(अ),279, 337, 338 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री सुर्यकांत कांबळे, मो.क्र. 9923413244** हे करीत आहेत.

## 7)फसवणुक :–

**किनवट** :– दिनांक 23.05.2022 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **गिरीराज ट्रडिंग कंपणी किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीने बुस्टर प्लॅट जेनेटिक औरंगाबाद प्रा. लिमिटेड या कंपनीकडुन सोयाबी व तुरीची बियाण्याची बॅग असे एकुण 23,89,020/–रूपयाच्या मालाची ऑर्डर मागविली असता टीएस–18/टी–6606 च्या ट्रक चालकाने घेवुन आलेले तुर व सोयाबीन बियाण्याचे 507 बॅग उतरवुन घेतले व उर्वरीत सोयाबीन जेएस 9305 30 किला वजनाचे 119 बॅग किंमती 4,46,250/रूपयाचा माल शिल्लक आहे. असे सांगुन तो निघुन गेला परत तो माल न दता ट्रक मालक ओम श्रीकृष्ण भिमराव जाधव, रा. निर्मल क्लीनर यांना घेवुन नेलेला माल परत देण्यास कळविले असता त्याने ट्रक चालकाची बाजु घेवुन त्यास मदत करत होता. यातील नमुद तीन आरोपीतांनी 4,46,250/–रूपयाचा सोयाबिन बॅग न देता फसवणुक केली. आज रोजी पोस्टेला फिर्यादी दिल्याने गुन्हा उशिराने दाखल झाला आहे. वगैरे **फिर्यादी श्री विनोद शंकर वट्टमवार, वय 59 वर्षे, व्यवसाय व्यापार प्रो. प्रा. गिरीराज ट्रेडींग कंपनी किनवट ता. किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 160/2022 कलम 420, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मामीडवार मो.नं. 9422743374** हे करीत आहेत.

## 8)पोलीस असल्याची बतावणी करून फसवणुक :—

**विमानतळ :—** दिनांक 13.08.2022 रोजी चे 12.00 ते 12.30 वा. चे दरम्यान, **प्रोफसर कॉलनी नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीतांनी संगणमत करून आम्ही पोलीस आहोत अशी बतावणी करून फिर्यादीचे हातातील सोन्याची चार ग्रॅमची अंगठी किंमती 16,000/—रूपयाची ही आमचे रजिस्टरमध्ये नोंद करायची आहे काढुन द्या असे म्हणुन अंगठी घेवुन एक कागदा मध्ये पुडी बांधुन फिर्यादीच्या खीशामध्ये टाकल्यासारखे करून लागलीच त्यांचे बुलेट मो सा वर दोघे बसुन निघुन गेल. फिर्यादीने कागदाची पुडी काढुन पाहिली असता त्यात फिर्यादीची अंगठी दिसली नाही. त्या दोन इसमांनी पोलीस असल्याची बतावणी करून फिर्यादीकडुन चार ग्रॅम सोन्याची अंगठी किंमती 16,000/—रूपयाची घेवुन फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी शंकरराव पि. नारायणराव सुर्यवंशी, वय 68 वर्षे, व्यवसाय शेती रा. गोविंद कॉलनी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 282/2022 कलम 419, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1334 जाधव, मो.नं. 9923078806** हे करीत आहेत.

## 9)प्रोव्हिबीशन :—

**1)वजिराबाद :—** दिनांक 14.08.2022 रोजी 16.00 वा. चे सुमारास, **कलामंदीर बोळीत,नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 4285/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोह/सुरेश लक्ष्मणराव घुगे, ने. स्थागुशा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 285/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1007 झांबरे, मो.क्र. 9923922533** हे करीत आहेत.

**2)हदगाव :—** दिनांक 14.08.2022 रोजी 09.00 वा. चे सुमारास, **हस्तरा रोड शिवराज हार्डवेअर चे बाजुस निवघा ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 4970/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/900 बालाजी व्यंकटी सातपुते, ने. पोस्टे हदगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 261/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/35 चिंतले, मो.क्र. 9284056205** हे करीत आहेत.

**3)वजिराबाद :—** दिनांक 14.08.2022 रोजी 16.30 वा. चे सुमारास, **महमद फंक्शन हॉल जवळील वाघी रोड जाणारे नाल्यावरच्या पुलावर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2450/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोका/170 संतोष शिवन्ना बेल्लुरोड, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 285/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1007 झांबरे, मो.क्र. 9923922533** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड